ISSN 2230-7850 Impact Factor : 3.1560 (UIF) Volume - 5 | Issue - 11 | Dec - 2015

Indian Streams Research Journal

# डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे लोकशाही आणि लोकांच्या सार्वभौमत्वाविषयीचे विचार

विरेंद्र शंकर धनशेट्टी
सहयोगी प्राध्यापक व राज्यशास्त्र विभागप्रमुख , श्री. ढोकेश्वर कॉलेज, टाकळी ढोकेश्वर,
ता. पारनेर, जि. अहमदनगर .



विरेंद्र शंकर धनशेट्टी

## *1.प्रस्तावना*

लोकशाही आणि लोकांच्या सार्वभौमत्व या संकल्पना__आधुनिक लोकशाही राज्यव्यवस्थांच्या केंद्रस्थानी आहेत. या वैश्विक मुल्यांबाबत विविध राज्यशास्त्रज्ञांनी, नेत्यांनी आणि दुरदर्शी मुत्सद्दयांनी चिंतन केले आहे. भारतीय राज्यव्यवस्थेच्या जडणघडणीत ज्यांनी लक्षणीय योगदान दिले अशा भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी लोकशाही आणि लोकांच्या सार्वभौमत्व या संकल्पनांबाबत मांडलेली भूमिका अत्यंत मुलगामी स्वरूपाची आहे. समकालीन संदर्भात त्यांची भूमिका समजून गेणे औचित्यपुर्ण ठरते.

## मागोवा :-

डॉ.बाबासाहेब आंबेडकरांचे या संकल्पनांबाबतचे विचार समजून घेण्यापूर्वी या संकल्पना आधुनिक स्वरूपात कशा विकसित झाल्या हे देखील समजून घेणे तितकेच महत्वाचे आहे. लोकशाही आणि लोकांच्या सार्वभौमत्व या मानवी समाजजीवनाच्या विकासकमातील अतिशय प्रगत अशा राज्यशास्त्रीय संकल्पना आहेत. सतराव्या शतकातील औदयागिक कांतीने मानवी समाजजीवनाला जे उन्नत असे नवे वळण मिळाले त्यातुन जीवनाच्या व जाणीवांच्या कक्षा



रूंदावल्या. अज्ञेयवादाचा, गुढतत्वाचा मानवी जीवनावरील प्रभाव कमीकमी होत गेला. सृष्टीशास्त्र व उत्पादन प्रकिया यांमधील विज्ञानाच्या वाढत्या वापराने भौतिकतावादाचा विकास घडून आला. या दरम्यानच्या प्रक्रियेत राजकीय क्षेत्रातही प्रचंड उलथापालथ घडून आली. ईश्वराच्या सार्वभौमत्वाची व मानवाच्या पराधीनतेची आजवरची जाणीव अशास्त्रीय आहे हे उमजून आले. त्यामुळे ईश्वराच्या सार्वभौमत्वाचे प्रतिनिधीत्व करणा-या सरंजामदारी राजाचे सार्वभौमत्वही अमान्य करण्याची, नाकारण्याची, धुडकावून लावण्याची आणि शेवटी नष्ट करण्याची आंदोलने लोकपातळीवरून युरोपात झाली. १७८९ ची फ्रेच राज्यकांती हे त्यामधील निर्णायक आंदोलन होते.

## फ्रेच राज्यक्रांती :-

इ. स. १७८९ मध्ये झालेल्या फ्रेच राज्यक्रांतीमध्ये राजा ला सांकेतिक अर्थाने नव्हे तर प्रत्यक्षात फाशी देऊन लोकांनी आपल्या सार्वभौमत्वाची व लोकशाही राज्यपध्दतीची व्दाही सा-या देशभर फिरविली व पोहोचविली. या फेच राज्यकांतीनेच लोकशाही आणि लोकांच्या सार्वभौमत्व या आधुनिक संज्ञांमागे राज्यशास्त्रीय व शासकीय भुमिका सा-या जगभर मान्यता पावतील असे प्रभावी बळ उभे केले. या फेच राज्यकांतीचे व तिच्यातील आशयाचे पोवाडे ज्या अनेक विचारवंतांनी, प्रचारकांनी गाईले, त्यामध्ये थॉमस पेन यांचे नाव आघाडीवर आहे. या थॉमस पेनच्या मानवाचे हकक या पूस्तकातील लिखाणाने प्रभावित होऊन आपल्या प्रज्ञेने व प्रतिभेने भारतीय समाजाच्या भवितव्याची चित्रे रेखाटण्याचा प्रयत्न महात्मा जोतिबा फुले यांनी केला. म. फुले यांच्यावर कबीरासारख्या भारतीय संतांच्या विचारंचा प्रमाव होता अशी भूमिका देशीवादाचे पुरस्कर्ते करीत आहेत. तरीही पाश्च्यात्य प्रेरणांचा प्रभाव आपणास नाकारता येत नाही. म. फुलेंनी आपला गुलामगिरी हा ग्रंथ अमेरिकेतील आफ्रिकन जनतेला (निग्रो) अर्पण केला यावरून ही बाब आणखी स्पष्ट होते. म. फुल्यांना गुरूस्थानी मानणा-या डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनीही आपल्या लोकशाहीविषयक व लोकांच्या सार्वभौमत्वाबाबतची प्रतिपादने करताना जागोजागी फेच राज्यकांतीचा व तिच्या कियाशील वैचारिक प्रेरणांचा आधार घेतला आहे.

फ्रेच राज्यकांतीमागील वैचारिकतेचा महत्वाचा भाग हा होता की, तिने तत्पूर्वीची राज्यकर्ता व जनता म्हणजेच शासक व शासित यांच्यातील परस्पर संबंधांची वैचारीक बैठकच मोडून टाकली. याचा सोपा अर्थ असा आहे की, पूर्वी राजा किंवा राज्यकर्ता वर्ग हा श्रेष्ठ, दैवर. अलौकीक असतो असे मानले जाई. फ्रेंच राज्यक्रांतीने या रूढ परंपरागत समजालाच जोरदार हादरा दिला. आता ही वस्तुस्थिती आपल्या भारतीय संदर्भात तपासून पाहील्यास आपल्या आकलनात भर पडेल. आपल्याकडे पानीपतच्या लढाईचे (१७६१) बखरकाराने केलेले वर्णन सर्वज्ञातच आहे. राजे व शिपाई यांच्या बलीदानाचे वर्णन करताना बखरकार असे लिहितो की, हिरा हरपला, रत्ने गळाली, कित्येक माणके गळाली, अगणित बंदे कामी आले आणि खुर्दा किती उधळला याची तर गणतीच नाही. माणसामाणसामध्ये हिरा-खुर्दा ही वर्गीय मांडणी पाहिल्यास सामान्य माणसाच्या जीवनाला त्याकाळी कवडीमोलाचे स्थान होते असे आपणास दिसुन येते. तेव्हा फ्रेच राज्यकांतीने मात्र सामान्य मारसांना खुर्दा न मानता याच सामुहिक जनशक्तीला केंद्रस्थानी मानले. या सामुहिक जनशक्तीला मध्यवर्ती मानून समाजजीवनाचा विचार करावयाचा हे या नव्या (आधुनिक) विचारांचे सार आहे आणि तोच फुले - आंबेडकरी विचारधारेचा आशय आहे.

### वास्तव :-

या पार्श्वभूमीवर भारतीय समाजजीवनाच्या संदर्भात येथील प्रत्यक्ष वास्तव पायाभून मानूनच या डॉ. आंबेडकरांनी आपले विचार, योजना, संस्था, संघटना आणि प्रत्यक्ष आंदोलने यांची मांडणी केलेली आहे. हजारो वर्षांच्या वर्णव्यवस्थेच्या परिणामाने इथे माणसा - माणसात उच्चनीचतेची, स्पृश्यास्पृश्यतेची, अन्याय, पिळवणूक प्रधान दहशती स्वरूपाची उतरंड मांडण्यात आली होती. या वर्ण व्यवस्थेच्या सर्वात खाली दबलेला जो शुद्रातिशुद्र दलित बहुजनसमाज होता त्यास जागं करण्याचं महत्कार्य डॉ. आंबेडकरांनी केले. त्यांच्याच शब्दात सांगायचं तर गुलामाला तो गुलाम आहे याची जाणीव करून दिल्याशिवाय तो बंड करून उठणार नाही. तेव्हा शतकानुशताकांची गुलामगिरी, न्यूनगंड फेकून देणारी अस्मिता जागवण्याचं कार्य डॉ. आंबेडकरांनी केलं.

### त्रिसुत्री :-

लोकशाही व लोकांचे सार्वभौमत्व या राज्यशास्त्रीय संकल्पना असल्या तरी यांच्या प्रस्थापनेसाठी' लोकजीवनाच्या सर्व अंगोपांगांची म्हणजे आर्थिक, सामाजिक, शैक्षणिक, सांस्कृतिक, वैचारिक अशी सर्वांगीण पुनर्रचना, फेरमांडणी आवश्यक आहे, याचेही भान त्यांनी आरंभापासुन ठेवले. सर्व माणसे समान आहेत आणि ती समानाधिकारी आहेत. हे वैचारिक सूत्र त्याकाळी स्वत:ला श्रेष्ठ समजणा-या प्रस्थापितांना व सत्ताधा-यांना ठणकावून सांगणे आवश्यक होते. हे जाणून त्यांनी आपल्या 'विद्रोही भूमिकांचे दर्शन आपल्या विपुल लिखाणातून, भाषणातून व शक्य तेव्हा लोकांच्या सामूहिक कृतीतून दिलेले आहेच, पण त्याहीपेक्षा या शोषित-दलित बहुजनसमाजाला शुदातिशुद्रांना या वैचारिक गुलामगिरीतून मुक्त होण्याची शक्ती देण्यासाठी त्यांनी शिक्षण, प्रबोधन व आंदोलन या तीनही मार्गाचा अवलंब विलक्षण अशा चिकाटीने, दृढनिश्चयाने, धैर्याने केला.

### लोकशाहीची व्याख्या :-

आपली लोकशाहीची व्याख्या व व्याप्ती स्पष्ट करताना डॉ.आंबेडकरांनी अनेकदा सांगितले आहे की, लोकांच्या आर्थिक व सामाजिक जीवनात जिच्याव्दारे रक्तपाताशिवाय मुलगामी क्रंतिकारक बदल घडवून आणता येतात अशी शासनाची घडण व पध्दती म्हणजे लोकशाही होय. लोकशाही या संकल्पनेचा व पध्दतीचा उदय अनियंत्रित राजेशाही वा हुकूमशाहीच्या विरोधात झालेला असला तरी ती केवळ निषेधात्मक व नकारात्मक स्वरूपातच नांदत नसते.तिची विधायक भूमिका व आशय स्पष्ट करताना ते म्हणतात की, 'लोकशाही आपले स्वरूप बदलत असते. एकाच देशातसुध्दा ती आहे त्या परिस्थितीत राहू शकत नाही. तिचे उददेश बदलत असतात. आधुनिक लोकशाहीचे ध्येय एखादया अनियंत्रित राजाचे अधिकार कमी करणे एवढेच नसून लोकांचे कल्याण साधणे हे आहे.

### सहजीवन :-

डॉ. आंबेडकरांनी भारतातील समाजजीवनात लोकशाहीचे चक्र गतिशील राहण्यासाठी आपल्याला सावध राहण्याचा ईशारा दिला आहे. ते म्हणतात, ' लोकशाही म्हणजे केवळ प्रजासत्ताक किंवा सांसदीय सरकार नव्हे, लोकशाहीची मुळे सरकारी पध्दतीत ,सांसदीय किंवा दुस-या कुठल्याही पध्दतीत नसतात. लोकशाही म्हणजे सहजीवनाने राहण्याची एक पध्दती आहे. लोकशाहीची मुळे सामाजिक संबंधात शोधायची असतात. जे लोक तो समाज बनवितात त्यांच्या सहजीवनाच्या (संबंधात ) संदर्भात तिची मुळे शोधायची असतात.

### इशारा :-

आपल्या घटनेने स्विकारलेल्या लोकशाहीबददल प्रत्येक भारतीयाला आनंद व अभिमान वाटणे स्वाभाविक आहे व रास्तही आहे पण त्याचबरोबर त्याच्या गुंगीत न राहता आपण उपयोगी नाही हे लक्षात आणून देण्यासाठी डॉ. आंबेडकरांनी जनतेला सावध केले. घटनेचा मसुदा मंजूर झाल्यानंतरच्या तृप्तीच्या वातावरणात अत्यंत महत्वाच्या भाषणात डॉ. आंबेडकर आंबेडकर म्हणतात, 'राजकीय लोकशाहीने आपण संतुष्ट राहता कामा नये. राजकीय लोकशाहीचे सामाजिक आणि आर्थिक लोकशाहीत रूपांतर केले पाहिजे. २६ जानेवारी १९५० रोजी आपणास राजकीय समता लाभेल पण सामाजिक व आर्थिक जीवनातील असमतोल आहे तसा राहील. जर ही विसंगती लोकशाही ही जर सामाजिक लोकशाहीवर अधिषिठत केले नाही तर ती टिकूच शकणार नाही.कारण सामाजिक लोकशाही म्हणजे स्वातंत्र्य,समता आणि बंधुभाव याची एक अखंड व अभंग अशी त्रिमूर्ती आहे.जर सामाजिक समता नसेल तर स्वातंत्र्याचा अर्थ मूठभर लोकांचे,जनतेचे राज्य असणे असा होईल. जर समता ही स्वातंत्र्यशून्य असेल तर ती व्यकतीच्या जीवनातील स्वंयप्रेरणा नष्ट करील. जर बंधुभाव नसेल तर स्वातंत्र्य व समता यांची वाढ साहजिकपणे होणार नाही.भारतीय समाजाने हे मान्य केले पाहिजे की,त्यामध्ये दोन गोष्टीचा अभाव आहे. या दोन गोष्टी म्हणजे सामाजिक समता व आर्थिक समता या होत.२६ जानेवारी १९५० रोजी आपल्याला राजकीय समता

लाभेल पण सामाजिक व आर्थिक जीवनातील असमानता राहील.जर ही विसंगती आपण लवकर नष्ट करण्याचा प्रयत्न केला नाही तर ज्यांना विषमतेची आच लागलेली आहे ते लोक घटनासमितीने इतक्या परिश्रमाने बांधलेला हा राजकीय लोकशाहीचा मनोरा उध्वस्त करून टाकल्याशिवाय राहणार नाहीत.

**विभूतीपूजा :-**

केवळ घटनासमितीला व राज्यकर्त्यांना असा रोकठोक इशारा करून डॉ.आंबेडकर थांबले नाहीत. त्यांनी आपला मोहरा सरळ लोकांकडे वळविला आणि आम जनतेला सावध करताना त्यांनी आपल्या समाजाच्या नेमक्या कमजोरीवर म्हणजे विभूतीपूजेवर बोट ठेवले आणि आवाहन केले की, 'ज्या थोर लोकांनी आयुष्यभर राष्ट्राची सेवा केली त्यांच्याविषयी कृतज्ञता बाळगण्यात काही गैर नाही परंतु कृतज्ञतेलाही काही मर्यादा असते.आपल्या स्वातंत्र्याचा बळी देऊन कुठलेही राष्ट्र कृतज्ञ राहू शकत नाही. दुस-या कोणत्याही देशापेक्षा भारतात ही सावधगिरी बाळगणे अत्यंत आवश्यक आहे.कारण भारतात विभूतीपूजेचा इतका जबरदस्त परिणाम होतो की, तसा परिणाम जगातील इतर कोणत्याही देशाच्या राजकारणात होत नाही. धर्मामध्ये भकती ही आत्म्याला मुकती मिळविण्याचा मार्ग असू शकेल पण राजकारणात भकती व विभुतीपूजा ही अधोगतीचा आणि अंति हुकूमशाहीचा निश्चित मार्ग आहे म्हणून समजावे.'

**राज्यघटना :-**

समाजाच्या सर्वांगीण (प्रगतीसाठी) परिवर्तनासाठी लोकशाही आणि लोकांचे सार्वभौमत्व या संकल्पना म्हणून स्विकारल्या व आचरणात आणल्या गेल्या पाहिजेत असा आग्रह म. फुल्यांनी दिडशे वर्षांपासून धरला. त्याला नेमका बांधेसुधपणा देण्याचे कार्य डॉ. आंबेडकरांनी केले. नवभारताची राज्यघटना तयार करण्याची संधी मिळताच आपली सारी बुध्दीमत्ता, तपश्चर्या व कुशलता पणाला लावून राज्यघटनेच्या मूलभूत सूत्रात त्यांचा समावेश केला. याप्रकारे डॉ. आंबेडकरांनी भारताच्या राजकीय क्षेत्रात लोकशाही आणि लोकांचे सार्वभौमत्व रूजविण्यात यश मिळविले. भारताच्या स्वातंत्र्य लढयात मोठया प्रमाणावर लोकांनी प्रत्यक्ष सहभाग घेतला. हालअपेष्टा सहन केल्या, त्याग केला. त्यामधून राजकीय स्वातंत्र्य आणि लोकशाही यासंबंधी लोकांच्या जाणीवाही उंचावलेल्या होत्या. त्यामुळे राजकीय लोकशाही संपत्ती किंवा शिक्षणाच्या अटीचा अडथळा आणून मर्यादीत व संकुचित करण्याचे उच्चभ्रू प्रस्थापितांचे प्रयत्न निष्फळ ठरविण्यात डॉ. आंबेडकरांना यश मिळू शकले. मात्र आर्थिक व सामाजिक क्षेत्रावरही सार्वत्रिक समानतेचा आधार निर्माण करण्याच्या, त्यांच्या भूमिकेला लोकपातळीवरील उठावाच्या अभावी घटना समितीमध्ये पाठिंबा मिळाला नाही. त्यांना अभिप्रेत असणारी लोकांच्या सार्वभौमत्वाची संकल्पना त्यांना साकार करता आली नाही. याचा अर्थ याबाबतीत प्रबोधन, संघटन आणि आंदोलने या तीनही आघाडयांवरील इतर प्रवाहांना यश आले नाही, हे स्पष्ट आहे. किंबहुना त्यासाठी पुरेसे प्रयत्नही झाले नाहीत असे म्हणजे जास्त उचित ठरेल.

**अपयश :-**

राजकीय, आर्थिक आणि सामाजिक या तीनही क्षेत्रांत लोकशाही आणि लोकांचे सार्वभौमत्व आवश्यक मानणारे भारतातील परिवर्तनवादी लोक, आंदोलनातील सर्व समविचारी प्रवाह या संपूर्ण कालखंडात एकत्र येऊ शकले नाहीत ही आपली या कालखंडातील एक वास्तव शोकांतिका आहे. परिणामी आपली लोकशाही राजकीय क्षेत्रापुरते मर्यादित राहिली. म्हणूनच ६९ वर्षापूर्वी राज्यघटना मंजूर करण्याच्या अखेरच्या टप्प्यावर डॉ.आंबेडकरांनी दिलेल्या इशा-याची आठवण ठेवीतच आपणाला पुढील वाटचाल करावी लागेल. नवी राज्यघटना मंजूर करून स्वतंत्र, सार्वभौम , धर्मातीत, लोकशाही, समाजवादी, संघराज्य या नव्या आधुनिक स्वरूपात भारतीय प्रजासत्ताक तुलनात्मक दृष्टया ब-याच चांगल्या पध्दतीने राजकीय लोकशाही वाटचाल करीत आहे हे जरी खरे असले तरी एका टप्प्यावर पोहोचल्यावर पुढील परिवर्तनासाठी, प्रवासासाठी आवश्यक असणा-या प्रबोधन, संघटन व आंदोलन या त्रीसुत्रीचा संकोच होत गेला. खुद्द डॉ. आंबेडकरांच्या हयातीतच या राजकीय लोकशाहीचे विघटीकरण व विकृतीकरण होण्याला सुरूवात झाली. ते थांबवून या तीनही पातळ्यांवरील लोककृतीला चालना देण्यासाठी आवश्यक ते संघटनात्मक साधन उभे करावे म्हणून डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी रिपब्लिकन पक्ष उभारणीचा संकल्प केला मात्र ही संकल्पाची रथयात्रा सुरू होण्यापूर्वीच बाबासाहेबांचे देहावसान झाले आणि जनवादी चळवळींची यात्रा तिथेच अडून पडली.

**आव्हान :-**

आपल्या तीस वर्षांच्या प्रयत्नातून डॉ. आंबेडकरांनी आपले सहकारी आणि अनुयायी यांची जी फळी उभी केली होती. तिला डॉ. आंबेडकरांच्या आधाराशिवाय त्यांच्या उत्क्रांतीवादी सुधारणांच्या वाटचालीतील उत्क्रांतीवाद ही पेलण्याची शक्ती प्राप्त झालेली नव्हती हे आंबेडकरी अनुयायांच्या ज्या चिरफळ्या उडाल्या त्यावरून स्पष्ट झाले आहे. त्यातही खरी शोकांतिका ही आहे की, लोकशाही आणि लोकांचे सार्वभौमत्व या डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या आग्रहाला आंतरीक विरोध असणा-या परंतू तो प्रकट करण्याचे धाडस त्यांच्या हयातीत न दाखवू शकलेल्या प्रस्थापित हितसंबंधी शक्ती आंबेडकरी अनुयायांच्या सत्ताकांक्षी आणि निवडणूकबाजी यांच्या जाळ्यात पकडून एका परीवर्तनवादी प्रवाहाचा विस्फोट करण्यात यशस्वी झाल्या आहेत. म. फुले - डॉ. आंबेडकरांना अभिप्रेत असलेल्या उत्कांतीवादी सुधारणांचा मार्ग कुंठीत झाला आहे. तेव्हा राजकीय स्वातंत्र्यानंतरच्या गेल्या ६८ वर्षांच्या वाटचालीत परीवर्तनाचा मार्ग फारसा पुढे सरकला नाही याची कारणे शोधणे जरूरीचे आहे. त्यामध्ये फुले - आंबेडकरांच्या शिका - संघटीत व्हा - संघर्ष करा या त्रिसुत्रीचा अभाव हे महत्वाचं कारण म्हणून लक्षात घ्यावं लागेल. थोर इटालीयन विचारवंत अंतोनियो ग्राम्सीने म्हटल्याप्रमाणे ही परीवर्तनाची अडलेली रथयात्रा पुढे नेण्याची जबाबदारी तुमच्या माझ्यासारख्या सुबुध्द नागरीकांवर आहे.

**संदर्भयादी :-**

१. डॉ. आंबेडकरांचे राजकीय विचार :- प्रा. म. द. देशपांडे, लोकवाड:मय गृह, १९९२

२. डॉ. आंबेडकरांच्या सामाजिक व राजकीय चळवळी :- श्री. कृष्णा मेणसे, लोकवाड:मय गृह, १९९२
३. डॉ. आंबेडकर यांचे विचार :- प्रा. सुहास पळशीकर, प्रबोधन प्रकाशन, १९९१
४. भारतीय राजकीय विचारवंत :- प्रा. बी. बी. पाटील, फडके प्रकाशन, १९९७